# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

## जुलै-ऑगस्ट २०१८ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत...

## प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत नियमित, पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा **जुलै-ऑगस्ट २०१८** मध्ये आयोजित करण्यात आलेली आहे. त्यासाठी सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षची आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे-

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार, दिनांक ०४/०६/२०१८ ते बुधवार, दिनांक १३/०६/२०१८ | गुरुवार, दिनांक १४/०६/२०१८ ते सोमवार, दिनांक १८/०६/२०१८ | सोमवार दिनांक २५/०६/२०१८ |
| विलंब शुल्क | गुरुवार, दिनांक १४/०६/२०१८ ते सोमवार, दिनांक १८/०६/२०१८ | मंगळवार, दिनांक १९/०६/२०१८ ते शुक्रवार, दिनांक २२/०६/२०१८ | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१.श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्ट २०१८ व फेब्रुवारी-मार्च २०१९ अशा लगतच्या दोन संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

**२ लातूर व कोकण विभाग वगळून इतर विभागीय मंडळांतील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियात मंडळाच्या खात्यामध्ये जमा करून बँक ऑफ इंडियाच्या चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात. लातूर विभागीय मंडळाच्या कक्षेतील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी एच.डी.एफ.सी.बँक (HDFC Bank) आणि कोकण विभागीय मंडळाच्या कक्षेतील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी ॲक्सिस बँक(AXIS Bank) या बँकेत मंडळाच्या जमा खात्यात शुल्क जमा करून चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.**

३.ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रुवारी-मार्च २०१८ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

४.नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

५. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ.१२ वी) परीक्षा सप्टेंबर-ऑक्टोबर २०१८ मध्ये घेतली जाणार नाही याची विद्यार्थी, पालक, प्राचार्य, मुख्याध्यापक व सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

६.आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावायाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(डॉ अशोक भोसले)
प्र.सचिव,
राज्यमंडळ, पुणे-०४